पुणे शहर पोलीस

# दर्पण

जानेवारी २०२०

# समुपदेशन व
# सामाजिक बांधिलकी

समुपदेशन व
सा. बांधिलकी

पुढारी – दि. १७ जानेवारी, २०२०

# माध्यमांची मते दिशादर्शक असायला हवी

## डॉ. के. व्यंकटेशम यांचे प्रतिपादन; टिळक महाराष्ट्र विद्यापीठात 'क्रायसेस कम्युनिकेशन' राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**पुणे : प्रतिनिधी**

माध्यमांकडून कोणत्याही घटनेची बारकाईने चिकित्सा न करता ब्रेकिंग न्यूज दाखवण्यात येते. माध्यमांमध्ये बदल घडविण्याची ताकत आहे. त्यामुळे माध्यमांची मते ही दिशादर्शक असायला हवी, असे मत पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी व्यक्त केले.



टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या 'जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन' विभागाच्या वतीने आयोजित 'क्रायसेस कम्युनिकेशन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम .

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या 'जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन' विभागाच्या वतीने आयोजित 'क्रायसेस कम्युनिकेशन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या हस्ते झाले, या वेळी ते बोलत होते. या वेळी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. श्री. ग. बापट, कुलगुरू डॉ. दीपक टिळक, मास कॉम विभागाच्या प्रमुख डॉ. गीताली टिळक आदी उपस्थित होते. या वेळी डॉ. सुभाष पवार लिखित 'ॲडव्हरटायझिंग अ नो कॉम्परमाईज बिझनेस' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. के. व्यंकटेशम यांच्या हस्ते झाले.

या वेळी डॉ. व्यंकटेशम म्हणाले, मुंबईतील २६/११ घटनेच्या दिवशी युद्धजन्य परिस्थिती असताना प्रसार माध्यमांद्वारे घटनेचे थेट प्रक्षेपण केले जात होते. सुरक्षा दले कधी, कोठून येत आहेत, त्यांच्याकडे शस्त्रे कोणती आहेत, त्यांची संख्या, कोणत्या दिशेने कारवाई सुरू आहे, याचे थेट प्रक्षेपण माध्यमे दाखवत होती. हल्ल्यामागील सूत्रधार या घटनेचे प्रक्षेपण पाकिस्तानमध्ये बसून पाहत होते. त्याची इथ्थंभूत माहिती ताज, नरिमन हाऊसमध्ये बसलेल्या दहशतवाद्यांना पुरविण्यात येत होती. त्यावेळी प्रसारमाध्यमांचा उपयोग पुरेपूर केला गेला. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस दले नेहमी येणाऱ्या पेचप्रसंगासाठी तयार असतात. मात्र, एखादी घटना घडल्यानंतर माध्यमातून संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांना बदलण्याची मागणी प्रामुख्याने समोर येते. अशावेळी नवीन अधिकारी आल्यास संबंधित प्रकाराची त्यांना माहिती नसते. ज्या अधिकाऱ्याच्या काळात घटना घडली आहे, त्यालाच घटनेचे गांभीर्य आणि बारकावे माहित असतात. त्यामुळे तोच अधिकारी ती परिस्थिती चांगल्या प्रकारे हाताळू शकतो, असेही डॉ. व्यंकटेशम यांनी सांगितले. तसेच वस्तुस्थिती आणि मते वेगवेगळी असू शकतात. माध्यमांच्या वार्तांकनामुळे चुकीचा संदेश जाऊ शकतो, असे ते म्हणाले.

या वेळी डॉ. टिळक म्हणाले, माध्यमांमध्ये संघर्ष आहे. पत्रकारिता आणि सामाजिक माध्यमे ही वेगवेगळी आहेत, हे जाणून घेतले पाहिजे. समाजमाध्यमांवर वैयक्तिक मत व्यक्त करणे हे चांगले आहे. मात्र, याचा वापर सामूहिक प्रचारासाठी होत असल्याचे दिसून येत आहे. देशातील माध्यमे प्रगल्भ झाली नसल्याची खंत या वेळी डॉ. टिळक यांनी व्यक्त केली. एन्झेन ग्रुपचे कथाकथनकार शशिधर नानजुंडिया, प्रसिद्ध पत्रकार परंजॉय गुहा ठाकूरता, विनिता देशमुख, दिनियार पटेल, प्रतिभा चंद्रन, प्रसिद्ध व्यंगचित्रकार बी. व्ही. पांडुरंग राव, ज्येष्ठ चित्र-रंगकर्मी अनिल झनकर, ग्लेनमार्क कम्युनिकेशनचे उपाध्यक्ष गणेश कनाटे आदींनी या वेळी आपले शोधनिबंध सादर केले.

### वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी माध्यमांचा आधार

शहरातील वाहतूक कोंडी ही फार मोठी समस्या आहे. वाहतूक कोंडी संदर्भात विविध वृत्तपत्रांत आलेल्या बातम्या आणि लेखांच्या आधारे समोर आलेले ६५२ प्रश्न विचारात घेत विविध उपाय केले. एकाच प्रश्नावर पुन्हा बातमी होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. तसेच चांगले प्रकल्प राबविण्यासाठी माध्यमांचा वापर करीत असल्याचे या वेळी डॉ. व्यंकटेशम यांनी सांगितले.

# सीसीटीव्हीमुळे अखेर गुन्ह्याची उकल

## खून, बलात्कारातील आरोपी पीडित मुलीचा नातेवाइक असल्याचे उघड; गुन्हा दाखल

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnakMT




**पुणे :** गुन्ह्याची उकल करण्यामध्ये तंत्रज्ञान अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असल्यामुळे पोलिसांकडून तपासादरम्यान सीसीटीव्ही, मोबाइल लोकेशन, सीडीआर या गोष्टींवर भर दिला जात आहे. धायरी परिसरात घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात काहीच धागेदोरे मिळत नसताना 'सीसीटीव्ही'ने महत्त्वाची भूमिका बजावली. संबंधित मुलीवर लैंगिक अत्याचार करणारा तिचा काकाच (मावशीचा नवरा) असल्याचे 'सीसीटीव्ही'मुळे पोलिसांना समजले. तो सीसीटीव्हीत दिसला नसता, तर त्याच्यावर कधीही संशय घेतला गेला नसता. त्यामुळे हा गंभीर गुन्हा उघडकीस आणण्यामध्ये तंत्रज्ञानाची मोलाची मदत झाली.

धायरी परिसरात १७ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून खून केल्याची घटना डिसेंबर २०१८ मध्ये घडली होती. पीडित मुलगी आई-वडील आणि लहान भावासोबत भाड्याच्या घरात राहत होती. ती अकरावीमध्ये शिकत होती. तिची आई मजूर म्हणून काम करते; तर वडील सेंट्रिंगची कामे करतात. दोघेही दररोज सकाळी कामाला गेल्यानंतर रात्री दहाला परत येतात. पीडित मुलगी सकाळी कॉलेजला जाते; तर भाऊ दुपारी शाळेत जातो. सहा डिसेंबर २०१८ रोजी मुलगी कॉलेज संपल्यानंतर घरी आली होती. त्यानंतर सायंकाळी तिचा भाऊ शाळेतून घरी आला. त्या वेळी त्याला बहीण पलंगावर बेशुद्ध अवस्थेत दिसली. त्याने तत्काळ आई-वडिलांना कळविले. त्यांनी येऊन पाहिल्यानंतर मुलीचा मृत्यू झाल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच सिंहगड रोड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. शवविच्छेदनानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघड झाले. या प्रकरणी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार तसेच खुनाचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात करण्यात आली.

सिंहगड रोड पोलिस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ निरीक्षक सरदार पाटील, उपनिरीक्षक गिरीश सोनवणे यांनी तपास सुरू केला. मुलीचे शेजारी, वर्गातील मैत्रिणी, मित्रांकडे चौकशी केली. मुलीचा मोबाइल तपासण्यात आला; पण त्यामधून पोलिसांना काहीच हाती लागत नव्हते. घटना घडली त्या बिल्डिंगमध्ये सीसीटीव्ही नव्हते; पण त्यांच्या जवळच्या सोसायटीमध्ये एक ठिकाणी सीसीटीव्ही होता. पोलिसांनी त्याचे फुटेज तपासले. त्या वेळी एक संशयास्पद व्यक्ती दिसत होती. मुलीच्या नातेवाइकांना ते फुटेज दाखविण्यात आले. त्या वेळी ती व्यक्ती मुलीच्या मावशीचा पती असल्याचे समोर आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्या वेळी त्याने आपण त्या दिवशी धायरी परिसरात आलो नसल्याचे सांगितले. पोलिसांनी पुरावा देताच त्याने बलात्कार व खून केल्याची कबुली दिली. पीडित मुलगी घटनेच्या दिवशी दुपारी साडेतीनच्या सुमारास घरी एकटी असताना आरोपी तिच्या घरी आला. त्याने मुलीला जेवायला वाढायला सांगितले. त्याने तरुणीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला. त्या वेळी तिने आरडाओरडा करून त्यास विरोध केला. त्यामुळे आरोपीने तिचा जोरात गळा दाबल्याने ती बेशुद्ध पडली. त्यानंतर त्याने तिच्यावर अत्याचार केले. ती शुद्धीवर येत असल्याचे लक्षात येताच त्याने तिचा गळा आवळून खून केला. कोणालाही संशय येऊ नये, म्हणून त्याने तिला पलंगावर झोपविले. तिचे केस, कपडे व्यवस्थित केले. त्यानंतर तो घरातून निघून गेला.

### गळ्यावरील जखमेमुळे संशय पक्का

पीडित मुलीच्या घराजवळील एका सोसायटीच्या सीसीटीव्हीमध्ये आरोपी जाताना दिसत होता. त्यामुळे पोलिसांना त्याच्यावर संशय होता. त्याची माहिती काढल्यानंतर त्याला दारूचे व्यसन असल्याचेही समजले. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीला सुरुवात केल्यानंतर त्याने 'ती माझ्या मुलीसारखी आहे, मी कशाला असे करू,' असे भावनिक बोलत होता. आपण मुलीच्या घराकडे गेलोच नाही, असे सांगत सतत सांगत होता. आरोपीच्या गळ्याजवळ जखम दिसत असल्यामुळे पोलिसांचा संशय पक्का झाला होता. पण, तो गुन्ह्याची कबुली देत नव्हता. गळ्यावरील जखम दाढी करताना झाल्याचे तो सांगत होता. पोलिसांनी त्याला 'सीसीटीव्ही' फूटेज दाखविल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली.



महाराष्ट्र टाइम्स – दि. १२ जानेवारी, २०२०

# पोलिसांसोबतच नागरिकांनीही बदलण्याची गरज

मटा संवाद

मटा live

## पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांचा 'मटा संवाद'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'भविष्यात सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ होणार आहे. पोलिसांकडून अत्याधुनिक पद्धतींचा वापर करून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न केले सुरू आहेत. पुणेकरांना सुरळीत आणि सुरक्षित वाहतूक देण्यासाठी येत्या वर्षात आवश्यक त्या उपाययोजना केल्या जाणार आहेत. प्रसंगी कठोर निर्णयदेखील घेतले जातील,' अशी भूमिका पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांनी नुकतीच मांडली.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीच्या नवव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'मटा संवाद' कार्यक्रमात पोलिस आयुक्त व्यंकटेशम् यांनी संवाद साधला. या वेळी त्यांनी शहरातील कायदा आणि सुव्यवस्था यांचा आढावा घेऊन आणि आगामी काळात पोलिसांच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती दिली. बदलत्या काळानुसार पोलिसांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांनीही आपल्यामध्ये काही बदल करण्याची गरज असल्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'भविष्यात खून, मारामारी, जबरी चोरी, घरफोडी अशा गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण कमी होणार आहे. तर, सायबर व आर्थिक गुन्हे झपाट्याने वाढत जाणार आहेत. गेल्या पाच वर्षांतील आकडेवारी पाहिली, तर असे लक्षात येते की, केवळ पुण्यामध्येच नव्हे; तर संपूर्ण देशभरात गंभीर गुन्ह्यांमध्ये घट होत आहे. नवनवीन पद्धतीने नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यावर नियंत्रण ठेवण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर राहणार आहे. सायबर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी आयटी तज्ज्ञांची मदत घेतली जाणार आहे. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. तसेच, अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जात आहे. त्यासाठी 'लर्निंग सेंटर'देखील सुरू करण्यात आले आहेत. सायबर गुन्ह्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन पुणे पोलिसांनी स्वतंत्र सायबर पोलिस ठाणे सुरू केले आहे. या पोलिस ठाण्याचे काम राज्यात सर्वांत चांगले ठरल्याचे दिसून आले आहे,' असे व्यंकटेशम् यांनी स्पष्ट केले.

### 'पुणेकर चांगल्या कामाच्या पाठीशी'

'नागपूरमध्ये पोलिस आयुक्त म्हणून काम करताना जे प्रयोग केले, तसेच प्रयोग पुणे पोलिस आयुक्तालयाची सूत्रे घेतल्यानंतर केले. येथे मिळालेला प्रतिसाद हा नागपूरपेक्षा हजारपटीने अधिक आहे, असे पोलिस आयुक्तांनी स्पष्ट केले. 'पुणेकर प्रत्येक बाबतीत दक्ष आहे. चांगल्या गोष्टींचे सतत कौतुक करतात, मदतीसाठी पुढे येतात. चुकीचे काही असेल तर लपवून ठेवत नाहीत, बिनधास्तपणे सांगतात. प्रसंगी नक्की काय केले पाहिजे, याचा सल्लाही देण्यास मागे पुढे पाहत नाहीत. पोलिसांकडून अपेक्षा काय यासाठी पुणेकरांकडून सूचना मागविल्या असता त्याला प्रतिसाद देऊन तब्बल ८५१ सूचना नागरिकांकडून करण्यात आल्या,' असे पोलिस आयुक्त डॉ. व्यंकटेशम् यांनी सांगितले.



### 'वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत'

शहरात वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली असून आजही आपल्याकडे वाहतुकीच्या नियमांचे पालन केले जात नाही. परिणामी शहरातील अनेक रस्त्यांवर वाहतूक कोंडी होते. सुरळीत आणि सुरक्षित वाहतूक ही भूमिका घेऊन पोलिसांनी काम करण्यास सुरुवात केली आहे. वाहतुकीला शिस्त लागावी आणि नियम तोडणाऱ्यांना धडा मिळावा, यासाठी ऑनलाइन दंडाची सिस्टीम आणण्याचा प्रयत्न आहे. प्रगतशील देशात वाहतुकीच्या नियमनासाठी ही अद्ययावत यंत्रणा वापरली जाते. वाहतुकीच्या नियमांबाबत केलेल्या जनजागृतीमुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी रस्त्यावरील अपघातांची संख्या १९ टक्क्यांनी कमी झाली असल्याची माहिती पोलिस आयुक्त व्यंकटेशम् यांनी केली.

फेसबुक लिंक : www.facebook.com/Maharashtratimesonline

### ठळक मुद्दे

- वाहतुकीसाठी ॲक्शन प्लॅन तयार करणार
- उघडकीस न आलेल्या खुनांच्या गुन्ह्यांचा आढावा घेणार
- महिला सुरक्षेकडे विशेष लक्ष देणार
- पुण्यासाठी पार्किंग धोरण आवश्यक
- आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना

पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांच्याशी संवादाचा व्हिडिओ पाहण्यासाठी हा क्युआर कोड स्मार्टफोनद्वारे स्कॅन करा.

पुढारी – दि. १३ जानेवारी, २०२०

# पोलिस स्थापना दिवस साजरा

## मोहल्ला कमिटी व शांतता कमिटी सदस्यांसह अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती

**पुणे : प्रतिनिधी**

पोलिस आयुक्तालयात मोठ्या उत्साहात पोलिस स्थापना दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी मोहल्ला कमिटी व शांतता कमिटी सदस्यांसह शहरातील ३० पोलिस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पोलिस स्थापना दिवस कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलिस अधिकारी.

या कार्यक्रमाचे आयोजन पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या वेळी सहपोलिस आयुक्त डॉ. शिसवे, अप्पर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, निरीक्षक शिल्पा चव्हाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पोलिस स्थापना दिवसाच्या निमित्ताने शहरातील संपूर्ण पोलिस ठाण्यांत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, उपस्थित मोहल्ला व शांतता कमिटीच्या सदस्यांना पोलिस आयुक्तांनी मार्गदर्शन केले. तसेच निरीक्षक शिल्पा चव्हाण यांनी पुणे पोलिसांच्या वतीने नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवांची माहिती दिली. तसेच डॉ. शिसवे यांनी उपस्थितांना संबोधित करताना चांगला विचार कधीच जुना होत नाही, तर त्यामध्ये सुधारणा होते. २०१९ मध्ये पोलिसांनी राबविलेल्या योजना नवीन वर्षात आणखी प्रभावीपणे राबविल्या जातील, असे आश्वासन उपस्थितांना दिले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १६ जानेवारी, २०२०

# कडू वागणाऱ्यांची माहिती द्या!

म. टा. प्रतिनिधी, पुणे



डॉ. के. व्यंकटेशम

## पोलिस आयुक्तांचे संक्रांतीनिमित्त ट्विट


'तीळगूळ घ्या, गोड बोला आणि कडू वागणाऱ्या किंवा बोलणाऱ्या लोकांची माहिती आम्हाला द्या,' अशा पुणेरी शैलीत पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी पुणेकरांना शुभेच्छा दिल्या. याशिवाय ही माहिती देण्यासाठी त्यांनी दोन क्रमांकही ट्विट केले.

'सद्रक्षणाय- खलनिग्रहणाय' असे ब्रीदवाक्य असलेल्या पुणे पोलिसांनी पुणेकरांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. नागरिकांच्या मनामध्ये पोलिस खात्याबद्दलचा विश्वास वाढावा, यासाठी पोलिस आयुक्त डॉ. व्यंकटेशम वेगवेगळे प्रयोग करत आहेत. बदलत्या काळानुसार आपणही बदलले पाहिजे, हे तत्त्व मनात ठेवून गुन्ह्यांच्या तपासासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय पोलिस आयुक्तांनी घेतला आहे. आजचे युग सोशल मीडियाचे आहे. त्यामुळे सामान्य जनतेच्या संपर्कात राहण्यासाठी पोलिस यंत्रणाही सोशल मीडियावर विशेष सतर्क असतात. गेल्या काही महिन्यांपासून पुणे पोलिस, तसेच पोलिस आयुक्त डॉ. व्यंकटेशम ट्विटरच्या माध्यमातून सोशल मीडियावर 'अॅक्टिव्ह' झाले आहेत.

मकरसंक्रांतीचे औचित्य साधून पोलिस आयुक्त व्यंकटेशम यांनी खास पुणेरी शैलीत नागरिकांना शुभेच्छा दिल्या. 'तीळगूळ घ्या, गोड बोला, आणि कडू वागणाऱ्या किंवा बोलणाऱ्या लोकांची माहिती आम्हाला द्या,' अशा शुभेच्छा देऊन, आयुक्तांनी ८९७५२८३१०० आणि १०० हे दोन क्रमांक प्रसिद्ध केले. या क्रमांकावर माहिती देत पुणेकरांनी सजग राहावे, असे आवाहनही त्यांनी केले. पोलिस आयुक्तांनी केलेल्या या 'ट्विट'ला ४० नागरिकांनी रिप्लाय दिला असून, कडू बोलणाऱ्यांची माहिती नक्कीच देऊ, तुम्हालादेखील संक्रांतीच्या शुभेच्छा, अशा शब्दांत प्रतिक्रिया दिल्या आहेत.

काही नागरिकांनी शहरातील काही भागांमध्ये अनेक चुकीचे उद्योगधंदे सुरू असून त्यावर कधी कारवाई करणार, असा प्रतिप्रश्न ट्विटरवरून केला आहे. पोलिस आयुक्तांचे ट्विट ८५ जणांनी 'रि-ट्विट' केले असून, ८३० नागरिकांनी याला 'लाइक' केले आहे.

प्रभात – दि. २६ जानेवारी, २०२०



पुणे : मॉडर्न हायस्कूलच्या मैदानावर पोलीस परेड सादर करण्यात आली असून याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

# विद्यार्थ्यांनी घेतला पोलीस परेडचा आनंद

पुणे, दि. २५ - मॉडर्न हायस्कूलच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी पोलीस परेडचा रोमहर्षक अनुभव घेतला. पुणे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांचा स्तुत्य व अभिनंदनीय उपक्रमात पोलिसांनी शाळेत जाऊन बॅन्डसह परेड केली.

पोलीस व विद्यार्थी यांच्यात संवाद वाढावा, त्यांच्याबद्दलची भीती जावी या उद्देशाने या परेडचे आयोजन करण्यात आले होते. या शाळेत बॅन्डपथकाच्या तालावर महिला पोलीस पथक व रस्ते वाहतूक विभागाची दोन पथके यांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने परेड सादर केली. यावेळी शीलरत्न बंगाळे यांच्या दिग्दर्शनाखाली वनराई संस्थेतर्फे द्वितीय क्रमांकाने गौरवण्यात आलेले पर्यावरण नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले.

या कार्यक्रमास वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त प्रसाद अकानवरू, ए.सी.पी. सुरेंद्र देशमुख, नागनाथ वाकुडे, चतु:शृंगी शाखेचे ए.पी.आय. प्रकाश मोरे, मॉडर्न हायस्कूलचे शाळा समिती अध्यक्ष दीपक मराठे, प्रमुख्याध्यापक मच्छिंद्र कांबळे, मुख्याध्यापिका छाया आंधळे, उपमुख्याध्यापिका शारदा साबळे, पर्यवेक्षिका निलिमा कुमावत, संस्था सदस्य उद्धव खरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश पाबळे यांनी केले. या स्तुत्य उपक्रमाबद्दल प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी कौतुक केले.

पुढारी – दि. ३० जानेवारी, २०२०



पी-फोर उपक्रम कार्यालयाचे उद्घाटन करताना अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, मुख्य समन्वयक सचिन मोरे आदी मान्यवर

# सतर्क नागरिक म्हणून पी-फोर उपक्रम

## अपर पोलिस आयुक्त मोराळे यांचे प्रतिपादन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

प्रत्येकाचे नागरिक म्हणून एक कर्तव्य आहे. त्यातूनच सतर्क नागरिक म्हणून पी-फोर उपक्रम आहे, असे प्रतिपादन अपर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे यांनी केले.

ते पोलिस आणि खासगी सुरक्षा रक्षक संघटनेच्या चालक-मालकांनी एकत्रित येऊन सुरू केलेल्या पी- फोर उपक्रम कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. या वेळी कामगार आयुक्त तथा पुणे जिल्हा सुरक्षा मंडळाचे अध्यक्ष निखिल वाळके, स्थानिक आमदार सुनील टिंगरे, माजी आमदार बापूसाहेब पठारे, सिनेअभिनेते सिद्धेश्वर झाडबुके, पुणे ग्रामीणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मलावडे, पोलिस निरीक्षक करपे आदी मान्यवर उपस्थित होते.

मोराळे म्हणाले की, पी-फोरच्या साह्याने माहितीची देवाण घेवाण करणे शक्य आहे. खाजगी संस्थेच्या मालकांनी परिसरातील संशयास्पद माहिती पोलिस ठाण्यांतर्गत केलेल्या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये पाठवावी, आमच्याकडून तत्काळ कारवाई केली जाईल व नागरिकांची सेवा करण्यासाठी आपण पोलिस प्रशासनाला जी मदत करत आहेत ती अतिशय मोलाची आहे. सतर्क नागरिक म्हणून आपण ही चळवळ उभी करत आहेत. त्यामध्ये काम करण्यासाठी सर्व नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ४ जानेवारी, २०२०

# 'पोलिस मित्र महत्त्वाचे'

## शंकर खटके यांना पोलिस मित्र गौरव पुरस्कार

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'पोलिस मित्रांच्या सहकार्यामुळे कायदा सुव्यवस्था राखणे सोपे होते. अनेक कठीण गुन्ह्यांचा तपास करताना पोलिस मित्रांची मदत महत्त्वाची ठरते. पोलिस घटनास्थळी पोहचण्याआधी पोलिस मित्रांच्या सतर्कतेमुळे गुन्हेगार सापडतो. त्यांच्या दक्षतेमुळे अनेकदा मोठे गुन्हे टळतात,' असे मत विशेष पोलिस महानिरीक्षक (गुन्हे अन्वेषण विभाग) दत्तात्रय मंडलिक यांनी व्यक्त केले.

पोलिस मित्र संघातर्फे 'पोलिस मित्र गौरव पुरस्कार २०२०' आणि 'पोलिस मित्र दिनदर्शिके'चा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर खटके यांना पोलिस मित्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी माजी विशेष पोलिस महानिरीक्षक विठ्ठल जाधव, विद्या जाधव, पोलिस मित्र संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मंडलिक, वर्षा मंडलिक, अकबर मेनन, जयराज लांडगे उपस्थित होते. तसेच, पोलिस आणि पोलिस मित्र यांचा सन्मान करण्यात आला.



पोलिस मित्र संघातर्फे 'पोलिस मित्र गौरव पुरस्कार' शंकर खटके यांना प्रदान करण्यात आला.

मटा सोशल नेटवर्किंग

'पोलिस या घटकाशी आपला जन्मापासून ते मृत्यूपर्यंत संबंध येतो. पोलिस खात्यामध्ये काम करताना कष्ट करण्याची आणि कोणत्याही वेळी मदतीला धावून जाण्याची तयारी असली पाहिजे. संयम ठेवून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. दैनंदिन कायदा सुव्यवस्थेत राज्यातील अथवा देशातील पोलिस विभागाची संख्या पाहिली असता या कामात मर्यादा येऊ शकतात,' असे मत मंडलिक यांनी व्यक्त केले.

जाधव म्हणाले, 'समाजातील आजची परिस्थिती पाहता पोलिसांनी शांतता आणि धार्मिक सलोखा राखून काम करण्याची गरज आहे. समाजात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिस खात्याला पोलिस मित्रांची खूप मोठी मदत होत आहे,' असेही त्यांनी सांगितले.

**Sakal Times** - 7 January, 2020

# Police chief stresses on proper communication during crisis



**ALL SMILES:** CP K Venkatesham (2L) releasing a book written by Dr Subhash Pawar at a programme at Tilak Maharashtra Vidyapeeth. Deepak Tilak (C) was also present. ANAND CHAINI

■ **ATISHAY JAIN**
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Commissioner of Police K Venkatesham spoke about the importance of communication and how things operate during a crisis. He was addressing a conference held at the Tilak Maharashtra Vidyapeeth on Monday.

He said, "One cannot get all the facts without having some distortion in them. Those who are handling the crisis cannot provide them while doing their job. For example, during the 26/11 attacks in Mumbai, there were five places that were under attack but media covered only two, providing too much information on these places. The information has to be timed rightly and checked properly before being provided to the people."

He added, "We are prepared for a crisis but the prevention doesn't find a place in the media. However, if we make one mistake then it's breaking news. If we start boasting our achievements then the people will set that as a working standard for us and always expect the same level of result."

Also present at the conference, award-winning cartoonist BV Panduranga Rao, prominent media professional and Educationalist Sashidhar Nanjundaiah and senior journalist Paranjoy Guha Thakurta explained how crisis can come at any level in society and how one can sustain it with proper methods.

---

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. ११ जानेवारी, २०२०

# शालेय वयातच लागावी खेळाची गोडी

**सहायक पोलिस आयुक्त विजय चौधरी यांचे मत**

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

'सध्याच्या काळात मुलांना मोबाइल आणि वाईट व्यसनांची सवय वाढत चालली आहे. मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांच्या मनावर परिणाम होत आहे. शाळेत असतानाच मुलांना विविध मैदानी खेळांची गोडी लागल्यास व्यसन आणि मोबाइलपासून लांब राहू शकतील. त्यामुळे मुलांना घडविण्यासाठी शिक्षकांवर मोठी जबाबदारी आहे,' असा सल्ला हिंदकेसरी आणि सहायक पोलिस आयुक्त विजय चौधरी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

पुणे महापालिका माध्यमिक व तांत्रिक शिक्षण आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे रामवाडी येथील सुभेदार रामजी मालोजी विद्यालयात सोमवारी उद्घाटन झाले. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चौधरी बोलत होते. स्थानिक नगरसेवक कर्णे गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन जगताप, महेश गलांडे, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी दीपक माळी, खेळाडू नीलेश पवळे आदी उपस्थित होते.

चौधरी म्हणाले, 'शहराचा झपाट्याने विकास होत असल्याने मोकळ्या मैदानांची संख्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. मुलांना खेळण्यासाठी मैदाने उरली नाहीत. त्यामुळे पालिका आणि खासगी शाळांना अभ्यासासोबत मैदानी क्रीडा स्पर्धा आयोजित करणे बंधनकारक केले पाहिजे. शाळेत असतानाच मुलांना खेळांची आवड निर्माण झाली पाहिजे. खेळामुळे मुलांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. याशिवाय हल्लीच्या मुलांना सिगारेट, तंबाखू, गुटखा व्यसनासोबत मोबाइलचे व्यसन जडले आहे. त्याचा शरीरावर घातक परिणाम होत आहे. यासाठी मुलांना खेळांमध्ये गोडी लावल्यास आपोआप मोबाइल आणि इतर व्यसनांपासून ते लांब होतील. मुलांना घडविण्यासाठी शाळेतील शिक्षकांवर मोठी जबाबदारी आहेच. त्याचबरोबर पालकांनीदेखील मुलांवर लक्ष देण्याची गरज आहे.'

# सिंहगडरोड परिसरात विद्यार्थ्यांची प्रभातफेरी

**धायरी : पुढारी वृत्तसेवा**

सिंहगडरोड परिसरातील विठ्ठलवाडी, हिंगणे खुर्द, आनंदनगर, माणिकबाग, महादेवनगर, तुकाईनगर, वडगाव बुद्रुक, सनसिटी, वडगाव खुर्द, नऱ्हे, धायरी, रायकरनगरमध्ये ध्वजवंदन करून विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली होती.

सिंहगडरोड पोलिस ठाण्यात सहाय्यक पोलिस आयुक्त पी. डी. राठोड यांच्या हस्ते ध्वजवंदन केले. या वेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकिशोर शेळके, सहायक पोलिस निरीक्षक सतीश उमरे, बालाजी साळुंखे, हणमंत ननावरे, प्रशांत कणसे, सुधीर घाडगे, चेतन चोरबोले, दीपक खेडकर, विनोद महांगडे, किशोर तनपुरे, राहुल शिंदे, काळे उपस्थित होते.

वडगाव बुद्रुक महापालिका शाळेत सामाजिक कार्यकर्ते दीपक दांगट यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.



सिंहगडरोड पोलिस ठाण्यात ध्वजवंदन प्रसंगी पोलिस अधिकारी.

यावेळी अध्यक्षस्थानी नगरसेवक हरिदास चरवड होते. सिंहगडरोड प्रभाग समिती अध्यक्षा नगरसेविका नीता दांगट, मुख्याध्यापिका संजीवनी मुंदडा, अंजली परदेशी, देशमुख, सुनिल कांबळे उपस्थित होते.

हवेली पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक अशोक शेळके यांच्या हस्ते ध्वजवंदन केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन नम, अजित शिंदे, प्रकाश कोंढाळकर, भारत चव्हाण, संजय शेंडगे, रामदास बाबर, प्रशांत देसाई, किरण बरकाले उपस्थित होते.

महालक्ष्मी मंदिर येथे गोल्डन फिटनेस क्लबचे अध्यक्ष यशवंत कटके यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नितिन वाघ, सिंहगड नागरी पत संस्थेचे चंद्रशेखर पोकळे, माजी नगरसेवक हरिश्चंद्र दांगट, राष्ट्रीय समाज पक्षाच्या पुणे शहर महिला अध्यक्षा सविता जोशी, देवेंद्र शूर, महेश विटे, रामचंद पोळेकर, राजू शिंदे, रामदास दारवटकर, आकाश बनसोडे, सुमन कदू, विद्या कुडले, साधना ढमाले, संजना राठोड राजू पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन राजमाता जिजाऊ नवरात्र उत्सव मंडळाचे राजू वाघ, राजू शिंदे यांनी केले होते.

सोनाई शिक्षण संस्थेच्या अजिंक्य देडगे पब्लिक स्कूल मध्ये ध्वजवंदन करण्यात आले. देशभक्तीपर व्याख्याने व गीते सादर केली. यावेळी भारत फोर्ज लि. चे व्हाईस प्रेसिडेंट राहुल लाळे, प्रमोद ठक्कर, सुनील बारस्कर, अजय मुटाटकर, शिवाजी दळवी, उद्योजक संतोष कोंडे, जीवन लगड, संस्थापक डॉ. बी.एन.आहेर, सेक्रेटरी पद्मिनी भोसले, राहुल मोकाशी, मुख्याध्यापक नवनाथ भांगे व शिक्षक उपस्थित होते.

कै. नारायणराव नवले शाळेत ध्वजवंदन नगरसेविका राजश्री नवले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे, सा. कार्यकर्ते दिलीप नवले, मुख्याध्यापिका राजश्री चव्हाण, हिरामण सगभोर, ह. भ. प.राजेंद्र येप्रे उपस्थित होते.

**लोकमत – दि. ३० जानेवारी, २०२०**

# आझमींना मदत करणाऱ्या जवानाचा गौरव

## विवेकानंद योगे यांना ब्रेव्हरी अ‍ॅवॉर्ड : लाईफ सेव्हिंग फाउंडेशनचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : मुंबई -पुणे द्रुतगती महामार्गावर मोटार अपघातात जखमी झालेल्या अभिनेत्री शबाना आझमी यांना तातडीने वेळेवर मदत करणारे महाराष्ट्र सुरक्षा दलातील जवान विवेकानंद योगे यांना सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या हस्ते ब्रेव्हरी अ‍ॅवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

द्रुतगती मार्गावर खालापूर टोल नाक्याजवळ १८ जानेवारी रोजी आझमी यांच्या मोटारीला अपघात झाला. या अपघातात आझमी यांना गंभीर दुखापत झाली. महाराष्ट्र सुरक्षा दलातील जवान विवेकानंद योगे अपघात स्थळापासून एक किलोमीटर अंतरावर थांबले होते. अपघाताची माहिती मिळताच योगे यांनी घटनास्थळी धाव घेतली. मोटारीचा दरवाजा उघडल्यानंतर, आझमी गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले. बेशुद्धावस्थेतील आझमी यांना योगे यांनी मोटारीतून बाहेर काढले. तातडीने त्यांनी रुग्णवाहिका चालकाशी संपर्क साधला. त्यानंतर योगे यांनी द्रुतगती मार्गावरील वाहतूक



सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या हस्ते महाराष्ट्र सुरक्षा दलातील जवान विवेकानंद योगे यांना ब्रेव्हरी अ‍ॅवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

जावेद अख्तर घटनास्थळी पोहोचले.

आझमी यांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळाली. द्रुतगती मार्गावरील वाहतूक सुरक्षेबाबत काम करणाऱ्या लाइफ सेव्हिंग फाउंडेशनचे देवेंद्र पाठक यांनी वृत्तपत्रातील छायाचित्रे दुसऱ्या दिवशी पाहिले. त्यानंतर पाठक यांनी आझमी यांना वैद्यकीय मदत करणारे जवान योगे यांचा शोध घेतला. महाराष्ट्र सुरक्षा दलातील ११७ जवान द्रुतगती मार्गावर तैनात असल्याची माहिती त्यांना मिळाली. अपघातग्रस्तांना तातडीने जवानांकडून मदत उपलब्ध करून दिली जात

पाठक यांनी योगे यांची भेट घेतली. महाराष्ट्र सुरक्षा दलातील अधिकारी चंद्रकांत जगलपुरे यांची भेट घेतली. पाठक म्हणाले, की विवेकानंद योगे यांच्या प्रयत्नांमुळे शबाना आझमी यांना गोल्डन अवरमध्ये वैद्यकीय मदत मिळाली. मदत करणाऱ्या नागरिकांची दखल घेऊन त्यांचा यथोचित सन्मान करणे गरजेचे आहे. या भावनेतून आम्ही योगे यांचा सत्कार केला. अशा उपक्रमांमुळे जखमींना मदत करण्यास नागरिक पुढे येतील. अपघातग्रस्तांना मदत करणारे देवदूताप्रमाणे असतात. नागरिकांनी मदत करावी, असे

**लोकमत – दि. ३ जानेवारी, २०२०**

# 'खाकी'त सुरेल आवाज

## पुण्यातील सागर घोरपडे यांचे गाणे सोशल मीडियावर व्हायरल

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सध्याच्या सोशल मीडियाच्या जमान्यात कोणतीही गोष्ट क्षणात व्हायरल होऊ शकते. आणि पोस्टमुळे ती व्यक्तीही जगभर प्रसिद्ध होते. हाच अनुभव पुणे पोलीस दलातील कॉन्स्टेबल सागर घोरपडे घेत आहेत. त्यांनी गायलेले गाणे सोशल मीडियावर धुमाकूळ घालत असून, महाराष्ट्रातूनच नाही तर जगभरातून त्यांना फोन येत आहेत.

सागर ऊर्फ विठ्ठल घोरपडे हे मूळ सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील रहिवासी. २०१२साली ते पोलीस दलात सामील झाले. गाण्याची आवडही त्यांना लहानपणापासून होती. मात्र संगीताचे शास्त्रीय शिक्षण घेण्याचा योग आलेला नाही. गावी भजनी मंडळात ते साथीला गायचे. त्यांचा आवाज ऐकून इतर गावातले लोकही त्यांना गायला बोलवायचे. पुढे नोकरी सुरु झाली आणि गाणे मागेच राहिले.

पण काही दिवसांपूर्वी त्यांच्या मित्राने एक नवे गाणे आणि संगीताचा ट्रॅक पाठवला आणि गाण्याचा आग्रह केला. सुरुवातीला त्यांनाही जमेल की नाही अशी शंका होती. पण त्यांनी सराव केला आणि ते गाणे रेकॉर्ड करून फेसबुकवर अपलोड केले. २७ डिसेंबरला अपलोड केलेले ते गाणे काही तासांत व्हायरल झाले. अनेक फेसबुक पेज आणि युजर्सनी ते शेअर केले. खाकी वर्दीच्या मागे दडलेल्या या अलवार आवाजाला अनेकांनी स्टेटसवर स्थान दिले. त्यांना अगदी दुबई, दक्षिण आफ्रिकेतूनही चाहत्यांचे फोन आले.

ते म्हणाले की, 'सुरुवातीला माझा आवाज लोकांना इतका आवडेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. आता मिळणारा प्रतिसाद बघून मन भरून आलंय. आता कामासोबत गाणेही वाढवण्याचा विचार आहे.



### खाकी घालणाराही माणूसच असतो

अनेकदा चित्रपटांतून, पुस्तकांमधून पोलिसांचे कठोर, रुक्ष असे चित्र रंगवले जाते. गुन्हेगार किंवा वाईट प्रवृत्तींवर जरब ठेवण्यासाठी त्यांना तसे वागावेही लागते. पण त्यांच्यातही संवेदनशील, हळवा आणि कलाकार मनाचा माणूस असतो. तो प्रत्येकाला दिसतोच असेही नाही, पण म्हणून पोलिसांवर असा शिक्का मारणेही योग्य नाही. पोलिसांची ही प्रतिमा बदलण्याचाही यामागे उद्देश असल्याचे घोरपडे यांनी सांगितले.

सकाळ – दि. १६ जानेवारी, २०२०

## साधना कन्या विद्यालयातर्फे रस्ता सुरक्षा अभियान

हडपसर : रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत हडपसर भाजी मंडई येथील जिजामाता चौकात चं. बा. तुपे साधना कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांना गुलाबपुष्प देऊन अभिनंदन केले. येथील भाजी मंडई चौकात सतत वाहनांची वर्दळ असते. अनेक वाहनचालकांकडून वाहतूक नियमांची पायमल्ली केली जाते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना वेळप्रसंगी दंडात्मक कारवाईलाही सामोरे जावे लागते; परंतु जे वाहनचालक वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत सजग असतात, त्यांचे कौतुक व्हावे, त्यांच्यापासून अन्य वाहनचालकांनी प्रेरणा घ्यावी, या उद्देशाने आयोजन केल्याचे विद्यार्थिनींनी सांगितले. या प्रसंगी हडपसर वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक ज्ञानदेव म्हेत्रे उपस्थित होते.



हडपसर : वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांना गुलाबपुष्प देताना साधना कन्या विद्यालयातील विद्यार्थिनी.

पुण्यनगरी – दि. २९ जानेवारी, २०२०

## पोलिसांविषयी आदर हवा : अभय छाजेड



। पुणे : प्रत्येक नागरिकाच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असलेल्या पोलीस बांधवांचा प्रत्येकाने आदर केलाच पाहिजे. पोलीस व नागरिक यांच्यातील संवाद वाढविण्याकडे प्रत्येक संस्थेने पुढाकार घ्यावा, असे मत काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड यांनी व्यक्त केले.

स्व. इंदुमती धन्नीलाल संचेती संस्थेच्या वतीने मार्केटयार्डातील सर्व पोलीस बांधवांचा प्रजासत्ताक दिनानिमित्त कृतज्ञता सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अभय संचेती यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक संभाजी निंबाळकर, ॲड. गौरी भटेवरा, विजय शिंगवी आदी उपस्थित होते. संचेती म्हणाले की, पुणे शहर देशातील सुरक्षित शहरांमध्ये गणले जाते. २४ तास पोलीस यंत्रणा तत्पर असते, त्यामुळे पोलीस बांधवांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. निंबाळकर म्हणाले की, संचेती यांनी कार्यक्रमाचे आयोजन करून पोलीस बांधवांचा विश्वास वाढवला आहे. आम्ही जे चांगले काम करतो, याची नोंद नागरिक घेतात. याचेच हा कार्यक्रम प्रतिक आहे. अशा कार्यक्रमांमुळे आमचे मनोबल वाढते.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ जानेवारी, २०२०

# 'गुन्हे उघडकीस आणण्यावर भर'

म. टा. प्रतिनिधी, पुणे



संभाजी कदम

'सायबर पोलिस स्टेशनच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात १३१ गुन्हे दाखल केले. त्यातील २९ गुन्हे उघडकीस आले आहेत. गुन्हे उघड होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणावर; तसेच शाळा, महाविद्यालयांच्या मार्गदर्शन करण्यावर भर दिला आहे,' अशी माहिती सायबर सेलचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीच्या नवव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'मटा संवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. 'मटा लाइव्ह'च्या माध्यमातून त्यांनी शहरातील नागरिकांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

कदम म्हणाले, 'ऑनलाइनच्या फसवणुकीला आळा बसावा, तसेच फसवणूक झालेल्या नागरिकांच्या तक्रार अर्जांचे निवारण करून त्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांनी गेल्या वर्षी पुणे शहरात सायबरसाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन सुरू केले आहे. सायबर पोलिस स्टेशनच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात १३१ गुन्हे दाखल केले. त्यातील २९ गुन्हे उघडकीस आले आहेत. गुन्हे उघड होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणावर; तसेच शाळा, महाविद्यालये आणि आयटी कंपन्या मार्गदर्शन करण्यावर भर दिला आहे. सायबर सेल विभागाने गेल्या वर्षात ७० कार्यशाळा घेतल्या आहेत.'

## ही काळजी घ्या...

- बँक खाते व डेबिट, क्रेडिट कार्डची माहिती कोणालाही देऊ नका.
- बँका कधीही तुमच्या खात्याची माहिती मागत नाहीत.
- ओटीपी क्रमांक व कार्डवरील सीव्हीसी क्रमांक कोणालाही देऊ नका.
- मॅट्रिमोनी साइटवरील ओळखीनंतर भेटल्याशिवाय व्यवहार करू नका.
- एटीएममधून पैसे काढताना त्या ठिकाणी स्कीमर अथवा छुपा कॅमेरा लावला नाही याची खात्री करा.
- ज्या नोकरीचे आमिष दाखवले जात आहे, त्याची खात्री करा.
- ऑनलाइन खरेदी करताना शक्यतो 'कॅश ऑन डिलिव्हरी'चा पर्याय निवडा.
- सोशल मीडियावर खासगी फोटो टाकू नयेत. कोणी त्रास देत असेल, तर तत्काळ पोलिसांशी संपर्क करा.

## 'अधिकृत ॲप घ्या'

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोनचा वापर वाढला आहे. वेगवेगळ्या प्रकारची ॲप डाउनलोड करण्याचे प्रमाण वाढले आहे. 'गुगल'वरून शोधताना अनेकदा खोटे पेज आणि बनावट लिंक मिळू शकते. त्यावर क्लिक केल्यानंतर माहिती विचारली जाते. ॲप डाउनलोड करताना थेट मान्यता घेतली जाते. यातून आपली माहिती संबंधितांकडे जाते. त्यामुळे अधिकृत ॲप डाउनलोड करावीत, असे आवाहन संभाजी कदम यांनी केले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २९ जानेवारी, २०२०

# 'भरोसा सेल'मुळे टळला घटस्फोट

मटा विशेष

Chaitanya.Machale
@timesgroup.com
Tweet : @ChaitanyaM_MT

पुणे : त्यांच्या सुखी संसारात 'का रे अबोला, का रे दुरावा'... अशी परिस्थिती आली... नवरा आपले म्हणणेच ऐकून घेत नाही... त्यात सासरच्या मंडळींकडून होत असलेला मानसिक त्रास... त्यांच्यात तुटलेला संवाद आणि त्याच्या घरच्या लोकांच्या दुर्लक्षामुळे दुराव्याच्या पातळीवर असलेला संसार मोडण्यासाठी 'ती' कोर्टाची पायरी चढली. तर एकीकडे पोलिसांच्या भरोसा सेलकडेही अर्जाने अर्ज केला होता... त्यांच्यात तुटलेला संवाद पोलिसांच्या सुसंवादामुळे पुन्हा जुळला. त्यांच्या संयमाने आणि संवादाने सुर जुळविण्यास पोलिसांना यश आले. विशेष म्हणजे त्यांचा संसार पुन्हा फुलला असून त्यांनी घटस्फोटाची केसदेखील मागे घेतली आहे.

अमित आणि सविता (दोघांचे नाव बदलले आहे). अमित बिझनेसमन आहे. सविता गृहिणी आहे. काही वर्षांपूर्वी त्यांचे लग्न झाले. अमित कामानिमित्त घराबाहेर असायचा, तर ती घरीच होती. तिची सासू कामाला जात होती. घरी आली की ती सविताला टोमणे मारत असे. तसेच अमित घरी आला की त्याला बोलावून घेत. त्यामुळे त्याला सविताला वेळ देता येत नव्हता. वेळ मिळाला की त्यांच्याशी बोलून घ्यायचा. होणाऱ्या त्रासाबद्दल सांगण्याचा तो प्रयत्न करत असे. मात्र घरच्यांबद्दल तक्रारी सुरू झाल्या की तो त्यावरही ऐकून घ्यायचा नाही.

घरातील ज्यांच्याबरोबर चालली तो नवरा आपल्याशी नीट बोलत नाही, वागत नाही त्यांच्याकडून मी कोणाकडेही मदत का घेऊ, या विचाराने सविता माहेरहून मदत घेत होती. या सर्व कारणांमुळे त्यांच्यात ताण, वैमनस्य वाढत गेला. यातून भांडणे झाली. त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. त्यामुळे तिने पतीसह सासरच्या मंडळींविरोधात मानसिक त्रास देत असल्याची तक्रार नोंदवून कोर्टात कौटुंबिक अत्याचार कायद्यांतर्गत अर्ज केला.

पोलिसांच्या 'भरोसा सेल'कडे अर्ज आल्यानंतर त्यांनी या दोघांशी चर्चा केली. दोघांमध्ये संवादाचा अभाव असून नात्याविषयी आदर नाही, माहेरहून मदत घेतलेली त्याला आवडत नाही आणि त्याच्या घरच्यांनी त्याचे भरलेले कान तिला आवडत नाहीत, असे महिला सहाय्यक कक्षातील अधिकाऱ्यांच्या या चर्चेमध्ये लक्षात आले. आतापर्यंत झालेले सर्व विसरून नव्या नात्याने एकमेकांना कसे समजावून घेतले पाहिजे, याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. या समुपदेशनाचा परिणाम असा झाला की त्यांचे संबंध सुधारत गेले. काही महिन्यांपूर्वी पत्नीकडून दाखल केलेली कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार तसेच घटस्फोटाची केसही तिने मागे घेतली असून सध्या त्यांचा संसार सुखाने सुरू आहे, असे 'भरोसा सेल'च्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनया कारंडे यांनी सांगितले.



### संसाराची गाडी रुळावर

दोघांशी बोलून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्या संवादामधील लुटुपुट भांडणे थांबवावी, असे सांगून त्यांनी एकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे वेळ कसा दिला पाहिजे, हे त्यांना समजावून सांगण्यात आले. कोणत्याही परक्या व्यक्तीच्या बोलण्यावर विश्वास न ठेवता एकमेकांशी स्पष्टपणे बोलावे. यामुळे नवरा-बायकोच्या नात्यात गैरसमज निर्माण होणार नाहीत, याबद्दल या जोडप्याला मार्गदर्शन करण्यात आले. परिणामी एकमेकांबद्दल मनात असलेला गैरसमज दूर होऊन मार्गे घसरलेली संसाराची गाडी पुन्हा रुळावर आली.



महाराष्ट्र पोलिस रेझिंग डे निमित्त मार्केटयार्ड पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संदेशनगर येथील शाळेच्या विद्यार्थ्यांना शस्त्रांस्त्रांची माहिती दिली.

# पोलिस रेझिंग डे निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पुणे :** महाराष्ट्र पोलिस रेझिंग डे निमित्त सिंहगड पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महापालिकेची वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळा व जेएसपीएम महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, महिला सुरक्षाविषयक कायदे, महिलांचे हक्क, पोलिस काका संकल्पना, चांगला व वाईट स्पर्श, अंमली पदार्थ, व्यसने, वाहतूक नियम, शिस्त व विविध कायदे यांबाबत यामध्ये मार्गदर्शन करण्यात आले.

वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळेमध्ये पोलिस उपनिरीक्षक नितीन जाधव, कर्मचारी व्हि.के. कुमकर, गिरी यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी शाळेतील सुमारे २५० विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापिका अंजली परदेशी व इतर शिक्षकवृंद उपस्थित होते. तर, जेएसपीएम महाविद्यालयात प्राचार्य लाड व शिक्षकवृंदांसह ७० विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २० जानेवारी, २०२०

# विद्यार्थ्यांनी केली जनजागृती

पुणे : केंद्र व राज्य सरकारच्या ३१ व्या रस्ता सुरक्षा सप्ताहाअंतर्गत 'एक रॅली सुरक्षिततेसाठी' या कार्यक्रमाचे आयोजन जयवंतराव सावंत पॉलिटेक्निक व वानवडी पोलीस ठाणे वाहतूक नियंत्रक पोलिस यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमात वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

या वेळी काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये 'जेएसपीएम'चे हडपसर संकुल संचालक डॉ. संजय सावंत, सहायक संकुल संचालक डॉ. माधवराव जाधव, प्राचार्य डॉ. सुभाष देवकर, प्रा. विनोदकुमार चंदनकर, मारुती काळबांडे, राहुल बेंबडे, सोनाली अंतद, अमृतराज खेमलापुरे, मधुरा कुलकर्णी, अमोल साबळे, वृषाली एरंडे, अक्षय कांबळे व कार्यालयीन अधीक्षक हेमंत वायमारे उपस्थित होते. पोलीस निरीक्षक राजेंद्र विभांडिक यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी वाहतूक सुरक्षेबाबत नागरिकांना माहिती दिली. एकूण १५० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. डॉ. देवकर म्हणाले, 'हेल्मेटमुळे जीवावर आलेले संकट तारून नेले जाते. तेव्हा हेल्मेट वापराची सक्ती घरातून झाली पाहिजे. तरुण पिढीला वाहतूक सुरक्षा व त्याची नियमावलीची माहिती होण्याची आवश्यकता आहे.' या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी गजानन नाचणकर, ज्योतिबा कुळळे, सुरेश गोरुळे, ज्ञानेश्वर गायकवाड, बापूसाहेब जगताप, प्रा. अनिकेत कुलकर्णी, प्रा. अमित तोतडे यांनी परिश्रम घेतले.



जयवंतराव सावंत पॉलिटेक्निक व वानवडी पोलिस ठाणे वाहतूक नियंत्रक पोलिस यांच्या वतीने रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त रॅली आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


लोकमत – दि. १७ जानेवारी, २०२०

# पुण्याच्या वाहतुकीत चांगली सुधारणा

## दोन वर्षांतील स्थिती : बेल्जियमच्या शिवप्रेमीची स्वारगेट पोलीस ठाण्याला भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : दोन-तीन वर्षांपूर्वी पुण्यात आलो होतो, त्या वेळेच्या वाहतुकीपेक्षा सध्या पुण्यातील वाहतुकीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. पुणे पोलीस उत्साही असून, त्यांची सहकार्याची भावना असल्याचे मत बेल्जियमचे शिवप्रेमी पीटर व्हेन फित यांनी सांगितले. पीटर व्हेन फित यांनी गुरुवारी स्वारगेट पोलीस ठाण्याला भेट दिली. यावेळी पुणे पोलिसांकडून राबविण्यात आलेल्या विविध योजनांची त्यांनी माहिती घेतली. त्यांना शिवाजी महाराजांच्या इतिहासाबद्दल विशेष आस्था आहे. त्याच प्रेमातून त्यांनी महाराष्ट्रातील तब्बल २०० गडकिल्ले पायी फिरले आहेत.



### दोन वर्षांपूर्वी भ्रमंतीस सुरुवात केली

१ ४७ वर्षांचे पीटर फित यांनी सांगितले की, आपण बेल्जियमचे नागरिक असून, १९९८ पासून चेन्नई येथे राहत आहे. वर्षातून २ महिने आपण भारतातील विविध राज्यांत भटकंती करत असतो. दोन-तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची भ्रमंती करण्यास सुरुवात केली आहे.

२ पुणे, मुंबई, सातारा, नाशिक या सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधील सुमारे २०० गडकिल्ल्यांवर पायी जाऊन आलो आहे. जीपीएस फोनचा वापर करून आपण ही सर्व भ्रमंती केली असून छोट्याशा स्लिपिंग बॅगसह बहुतेक वेळा गडावरच रात्रीचा मुक्काम केला. या प्रवासात ग्रामीण भागातील ग्रामस्थांचे आदरातिथ्य आणि जेवणावळ ते करत असलेला आग्रह याने आपण भारावून गेलो असल्याचे सांगितले.

पुणे पोलिसांच्या कामकाजाबद्दल असलेल्या कुतूहलातून बेल्जियमचे नागरिक पीटर व्हेन फित यांनी स्वारगेट पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट दिली. राज्यामध्ये भ्रमंती करत असताना त्यांना महाराष्ट्र पोलिसांचा देखील खूप चांगला अनुभव आल्याचे पीटर सांगतात. याच कारणातून त्यांनी पुणे पोलिसांचे कामकाज कसे चालते हे जाणून घेण्यासाठी स्वारगेट पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट दिली.

या वेळी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवाडी यांनी शिवाजी महाराजांचे पुस्तक देऊन त्यांचे स्वागत केले.

त्यांनी बेल्जियम येथील पोलिसांचे कामकाज कसे चालते याची माहिती देत पुणे पोलिसांच्या कामकाजाची व त्यांच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवा जाणून घेतल्या.

नाईकवाडी यांनी पिटर यांना पुणे पोलिसांच्या भरोसा, सेवा, ज्येष्ठ नागरिक, महिला सुरक्षा कक्ष यांसह विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच वाहतुकीच्या समस्या व त्यावरील उपाययोजना याबाबत चर्चा केली.

पुण्यनगरी – दि. १९ जानेवारी, २०२०

# सावत्र बापाकडून मुलीवर अत्याचार

## ❑ दामिनी पथकाच्या तत्परतेने आरोपीस बेड्या

**पुणे : प्रतिनिधी**

सावत्र बापच मागील दोन वर्षांपासून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दामिनी पथकाच्या महिला मार्शलने हा प्रकार समजताच पीडित मुलगी आणि तिच्या आईला पोलीस ठाण्यात नेऊन गुन्हा दाखल केला.

स्वारगेट-लष्कर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या दामिनी मार्शल जयश्री भालेराव आणि स्वाती रणसिंग या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालीत होत्या. दरम्यान, त्यांना परिसरातील एका शाळेतून कॉल आला. शिक्षण घेणाऱ्या एका मुलीवर अत्याचाराची घटना घडली आहे आणि मुलीचे पालकही शाळेत आले आहेत, अशी माहिती मिळाली.

दामिनी मार्शलनी ताबडतोब घटनास्थळी धाव घेतली. शाळेचे उपप्राचार्य आणि आईची भेट घेतली असता शाळेची विद्यार्थिनी असलेल्या अल्पवयीन मुलीवर तिचा सावत्र बापच लैंगिक अत्याचार करीत असल्याचे उघडकीस आले. आरोपी मागील दोन वर्षांपासून खाण्यातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार करीत होता. त्यामुळे मुलगी दोन महिन्यांची गर्भवती राहिली होती. त्यानंतर आरोपीने खासगी हॉस्पिटलमध्ये घेऊन जात तिचा गर्भपात केला असल्याची माहिती मार्शलना समजली.

भरोसा सेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजया कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक स्वाती केदार, सहायक निरीक्षक सुजाता शानमे, मार्शल जयश्री भालेराव आणि स्वाती रणसिंग या दामिनी मार्शलने पीडित मुलगी आणि तिच्या आईला कोंढवा पोलीस ठाण्यात घेऊन गेले. तेथे आरोपीवर गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपी पित्यास बेड्या ठोकल्या.

पुढारी – दि. १३ जानेवारी, २०२०

# वाहनचालकांना वाहतूक नियमांचे धडे

## चतु:शृंगी वाहतूक विभागाकडून रस्तासुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजन

**पुणे :** चतु:शृंगी वाहतूक विभागाच्या वतीने हुतात्मा राजगुरू शाळेतील विद्यार्थ्यांनी वाहनचालकांना वाहतूक नियमांचे धडे दिले. रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात चतु:शृंगी परिसरातील सेनापती बापट रोडवरील पत्रकारनगर चौकात विद्यार्थ्यांनी हाती फलक धरून वाहनचालकांना वाहतूक नियमांची माहिती दिली.



रस्तासुरक्षा सप्ताहानिमित्त चतु:शृंगी वाहतूक विभागाच्या वतीने हुतात्मा राजगुरू शाळेतील विद्यार्थ्यांनी वाहनचालकांना वाहतूक नियमांचे धडे देण्यात आले.

या वेळी विभागाचे पोलिस निरीक्षक प्रकाश मासाळकर, चतु:शृंगी वाहतूक विभागाचे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रकाश मोरे, हुतात्मा राजगुरू शाळेतील प्राचार्या संगीत शेटे व इतर शिक्षक, तसेच, सुमारे ५० विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



विश्रांतवाडी : 'इम्मान्युएल मानथोमा स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांबाबत आणि रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती केली.

# विश्रांतवाडीत जनजागृतीसाठी विद्यार्थी रस्त्यावर

**पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) -** येरवडा वाहतूक विभागातील विश्रांतवाडी येथील मुख्य चौकात 'इम्मान्युएल मानथोमा स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांबाबत आणि रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती केली. यावेळी विद्यार्थ्यांनी 'आरएसपी'च्या गणवेष परिधान केला होता. तर, हातामध्ये माहिती फलक घेऊन सिग्नल लागल्यानंतर झेब्रा क्रॉसिंगवर थांबून वाहनचालकांचे लक्ष त्या माहितीफलकांकडे वेधून घेत होते. यावेळी दुचाकीवर हेल्मेट घातलेल्या वाहनचालकांना गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.

यासह परिसरात रॅली काढून 'नो-पार्किंग'च्या ठिकाणी वाहने उभी करू नयेत, असे आवाहन केले. शाळेतील बँड पथकाकडून ढोल, ताशा वाजवून नागरिकांचे या रॅलीकडे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमाचे आयोजन येरवडा वाहतूक विभागाचे निरीक्षक रमेश साठे यांनी केले होते. 'भविष्य देशाचे तुमच्या हाती, काम गमविता प्राण अपघाती', 'जीवन आहे मोलाचे, भान ठेवा वेगाचे', 'आपण आपल्या कुटुंबियांसाठी सर्वोत्तम गिफ्ट आहात' आदी आशयांचे संदेशफलक हातात घेत प्रबोधन केले.

सकाळ – दि. १ जानेवारी, २०२०

# रूल्स नहीं, कैसे चलेगा दीदी ?

## पुणे पोलिस व नेटिझन्समध्ये नववर्षाच्या पूर्वसंध्येला रंगले 'ट्विटवॉर'

पुणे, ता. ३१ : 'दीदी को कुल भी अॅक्ट करना है, दीदी को पार्टी भी करना है, दीदी को रूल्स भी नहीं फॉलो करना है, ऐसे कैसे चलेगा दीदी...' अशा आशयाने पुणे पोलिसांच्या ट्विटर हॅंडलवर चर्चा सुरू झाली. त्यानंतर काही क्षणातच त्यास शेकडो नेटिझन्सनी प्रतिसाद द्यायला सुरुवात केली. नेटिझन्सची खुमासदार बोचरी टीका अन् त्याला तितक्याच नर्मविनोदी शैलीमध्ये पोलिसांकडून मिळणारे दिलखुलास उत्तर... ट्विटरवर नववर्षाच्या पूर्वसंध्येला रंगलेली ही गमतीदार चर्चा उत्तरोत्तर रंगत गेली.

ऐरवी पोलिस हा सर्वसामान्यांच्या टीकेचा धनी ठरतो; पण मंगळवारची सायंकाळ त्यास अपवाद ठरली. सरत्या वर्षाला निरोप देताना अन् नववर्षाचे स्वागत करताना नागरिकांनी मद्यपान करून वाहने चालवू नयेत, अमली पदार्थांचे सेवन करू नये म्हणून पुणे पोलिसांच्या ट्विटरवर जनजागृती करण्यात येत होती. पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनीही 'ड्रंक अॅण्ड ड्राइव्ह'बाबतचे ट्विट केले होते. त्यानंतर पोलिसांच्या ट्विटरवर 'चरस, गांजा, म्याऊ म्याऊ, २०२० मध्ये हे सर्व नको भाऊ' असे दुसरे ट्विट पोलिसांनी केले. त्यानंतर 'एलएसडी परवानगी आहे का' अशा ट्विटला पोलिसांनीही तितकेच गमतीदार उत्तर दिले. त्यापाठोपाठ पोलिसांनी 'ऐसे कैसे चलेगा दीदी' ट्विट केल्यानंतर नागरिकांच्या आणखी गमतीदार ट्विटला सुरुवात झाली. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पुणेकर व पुणे पोलिस यांच्यामध्ये हा गोड 'ट्विटवॉर' सुरू होता.

दरम्यान, 'एलएसडीला परवानगी आहे का', या ट्विटर पोलिसांनी 'सांगा कुठे शोधायचे ते' असे उत्तर दिले. त्यानंतर पुन्हा एका तरुणाने 'अगर मैने आपको अड्डा बता दिया तो १० पुडीया मेरी, चलेगा ना सर' असे आणखी एक धमाकेदार ट्विट केले. त्याला पोलिसांनीही तितक्याच नर्मविनोदी शैलीमध्ये 'सर आप सब रख लेना, हम बस आपको रख लेंगे, चलेगा ना सर' असा ट्विट टोला लगावला. पोलिस व नेटिझन्समध्ये हा गमतीदार संवाद उत्तरोत्तर वाढत गेला. त्याला आणखी नागरिक प्रतिसाद देत गेले, त्यामध्ये सहभागी होत गेले आणि ट्विटची ही मैफील उशिरापर्यंत सुरूच राहिली.




#PuneCityPolice